**फौ. कि. चौ. अर्ज क्र.४७/२०२३**

**सौ. सलोनी+०१ वि.सागर**

**CNR No. MHRG090002172023**

**<u>अर्ज नि.क्र.०५ खाली आदेश</u>**

०१. अर्जदार क्र.०१ हिने प्रस्तूतचा अर्ज कौटूंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ ('कौटूंबिक हिंसाचा अधिनियम' संक्षीप्त स्वरूपात) चे कलम १८ अन्वये उत्तरवादी याचेविरूद्ध संरक्षण आदेश, कलम १९(१)(अ) व (ड) अन्वये निवासाचे अनुशंगाने आदेश, कलम २१ अन्वये मुलगा स्वराजचे ताब्यासंबंधी आदेश व कलम २३ अन्वये उत्तरवादी याचेकडून प्रति महिना रू.८,०००/– आर्थिक अनुतोष मिळणेकरीता दाखल केला.

०२. अर्जदार क्र.०१ हिने दाखल केलेला सदरील अर्ज व उत्तरवादी यांनी सदर अर्जावर त्यांचे दिलेले म्हणणे (नि.क्र.१३) वाचले. अर्जदार क्र.०१ व उत्तरवादी यांचे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०३. अर्जदार क्र.०१ व उत्तरवादी यांचे कथनाकडे वळण्यापूर्वी कौटूंबिक हिंसाचार अधिनियम मधील कलम २३ चे अवलोकन करणे न्यायोचीत ठरेल. सदरील कलमाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता उत्तरवादी याने कौटूंबिक हिंसाचाराचे कृत्य केले आहे किंवा ते तो कृत्य करीत आहे किंवा सदरील स्वरूपाचे कृत्य घडणे त्याचेकडून संभाव्य आहे अशी न्यायालयाची अर्जदाराने केलेल्या अर्जावरून सकृतदर्शनी खात्री झाली असता न्यायालय कौटूंबिक हिंसाचार अधिनियम खाली नमूद कलम १८ ते २२ मधील मागण्यांचे अनुशंगाने अंतरीम किंवा एकतर्फी आदेश पारीत करू शकत असल्याचे स्पष्ट होते.

०४. अर्जदाराने प्रस्तूतचा अर्ज शपथेवर संरक्षण अधिकारी यांचे मार्फत दाखल केला. अर्जातील कथन उत्तरवादी यांनी अर्जदार क्र.०१ हिचेवर शारिरीक, मानसिक व

आर्थिक प्रकारचा त्रास देवून तिचेवर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे दर्शविते. अर्जदाराचे कथन उत्तरवादी यास दारूचे व जुगाराचे व्यसन असून तो तिला दारू पिवून शिवीगाळ व मारहाण करतो, उत्तरवादी याने तिचे नकळत तिचे सर्व दागिने जुगार व व्यसनापोटी विकले, तो तिचे चारित्र्यावर संशय घेतो, उत्तरवादी याने दि.१०.०६.२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये तो अर्जदार हिला शिवीगाळ व मारहाण करणार नाही असे लिहून दिले, परंतू तो तसा वागला नाही, उत्तरवादी याने पोलीस स्टेशनला देखील तो अर्जदारास त्रास देणार नसल्याचे लेखी लिहून दिले, परंतू, तो त्याप्रमाणे वागला नाही व दि.२६.०३.२०२३ रोजी त्याने अर्जदाराची माहेरी येऊन त्यांचा मुलगा म्हणजेच अर्जदार क्र.०२ ला त्याच्याकडे घेवून गेला, उत्तरवादी हा धाटाव एम.आय.डी.सी.मधील रेप्टाकोर्स या कंपनीमध्ये काम करीत असून त्याला प्रतिमहिना रू.१५,०००/– वेतन मिळते, या उलट अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, उत्तरवादी याने दिलेल्या त्रासापोटी अर्जदार क्र.०१ हिला सासरचे घर सोडून तिचे माहेरी नाईलाजास्तव रहावे लागत आहे, या बाबी दर्शविते. परिणामी, तिने प्रस्तूतचे अर्जाद्वारे परि.क्र.०१ मधील नमूद मागण्या उत्तरवादी यांना पूर्ण करण्याचे अनुशंगाने आदेश देण्याची विनंती केली.

०५. याउलट उत्तरवादी याचे कथन असे दर्शविते की, अर्जदार क्र.०१ हिचेसोबत त्याने तिचे घरच्यांचे विरोधात जाऊन लग्न केले, लग्नानंतर काही वर्षांनी अर्जदार हिचे माहेरी जाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले, ती त्याचे आईवडीलांना घालून पाडून बोलणे, त्यांचेसोबत भांडण करणे अशी वागू लागली, त्याने अर्जदार हिचे सांगण्यावरून एकत्र कुटूंबापासून वेगळे राहणे सुरू केले, त्याकरीता त्याने कर्ज घेतले, त्याची परिस्थिती नसताना देखील अर्जदार हिचे नर्सिंग कोर्सचा शिक्षणाचा खर्च सोसला, त्याने तिचे पगाराबाबत कधिही तिला विचारणा केली नाही, अर्जदार ही घरातील लहान वादावरून पोलीस स्टेशनला तक्रारी करायला लागली, अर्जदार हिचे वडिलांकडे राहते घर व शेती आहे, त्यांचा स्वतःचा टेम्पो आहे, तिची आर्थिक परिस्थिती सधन आहे व ती नर्सिंग कोर्सचे बळावर चांगल्या प्रकाराची नोकरी मिळवू शकते. अर्जदार क्र.०१ हिने

त्याला केवळ त्रास देण्याकरीता प्रस्तूतचा अर्ज दाखल केला. सबब, उत्तरवादी याने प्रस्तूत अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०६. पुढे जाण्यापूर्वी अर्जदार क्र.०१ व उत्तरवादी यांना मान्य असलेल्या बाबी विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. अभिलेखाची काळजीपूर्वक पहाणी केली असता अर्जदार क्र.०१ व उत्तरवादी क्र.०१ यांचे लग्न दि.१९/०६/२०१४ रोजी मौजे वरसगाव येथे पार पडले, ही बाब दोन्ही पक्षांना मान्य असल्याचे दिसून पडते.

०७. अर्जदार क्र.०१ व उत्तरवादी याने त्यांचे कथन शपथेवर अभिलेखावर दाखल केले. नमूद परिस्थितीमध्ये कोणता पक्ष सत्य बोलत आहे?, हे ठरविणे काही अंशी कठिण आहे. परंतू, अर्जदार क्र.०१ हिने प्रस्तूतचा अर्ज संरक्षण अधिकारी यांचे मार्फत दाखल केल्याचे दिसून पडते. उल्लेखनीय बाब म्हणजे अर्जदाराचे कथनास संरक्षण अधिकारी यांनी त्यांचे कौटूंबिक घटना अहवालाद्वारे दुजोरा दिल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे अर्जदार क्र.०१ हिने अभिलेखावर महिला समुपदेशन केंद्र पोलीस स्टेशन, रोहा येथे केलेल्या तक्रारीची प्रत अभिलेखावर दाखल केल्याचे देखील दिसून येते.

०८. सामान्य परिस्थितीमध्ये कुठलिही भारतीय स्त्री तिचे सासरी तिला योग्य प्रकारची वागणूक मिळत असल्यास तेथे राहण्याचे नाकारून तिचे आईवडीलांचे घरी राहण्याचा पर्याय निवडणार नाही. उत्तरवादी याने अर्जदाराचे चुकीचे वागण्याबाबत कोणत्याही प्रकारचा स्वतंत्र पुरावा किंवा त्या अनुशंगाने त्याने केलेल्या कारवाईबाबत देखिल पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. नमूद परिस्थितीमध्ये अर्जदाराने संरक्षण अधिकारी यांचेमार्फत केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे दिसून पडते.

०९. उत्तरवादी याचे अर्जदार क्र.०१ हिचे चारित्र्यावर संशय घेणे, त्याला असलेलया दारूचे व जुगाराचे व्यसनापोटी व इतर कारणावरून अर्जदाराला शिवीगाळ व मारहाण करणे, तिला घर खर्चाकरीता रक्कम न देणे पंच व पोलीस स्टेशनमध्ये चांगले वागण्याची लेखी हमी देऊन देखील त्याप्रमाणे न वागणे, मुलगा स्वराज याला अर्जदाराकडे परत न घेवून जाणे, या बाबी कौटूंबीक

हिंसाचार अधिनियमाच्या कलम ०३ मधील 'शारिरीक दुर्व्यवहार', 'शाब्दीक आणि भावनीक दुर्व्यवहार' या संकल्पनांमध्ये मोडतात. त्याचप्रमाणे उत्तरवादी याने अर्जदार क्र.०१ तिचे माहेरी राहात असल्यापासून तिला कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत केल्याचे अभिलेखावरून दिसून येत नाही. उत्तरवादी याचे नमूद वर्तन कौटूंबिक हिंसाचार अधिनियम कलम ०३ मधील 'आर्थिक दुर्व्यवहार' या संकल्पनेमध्ये मोडते. अभिलेखावर उपलब्ध वरील पुराव्याचे विवेचनाअंती उत्तरवादी याने अर्जदार क्र.०१ हिचेवर कौटूंबिक हिंसाचार केला, असे माझे सकृतदर्शनी मत पडते.

१०. अर्जदार क्र.०१ हिचे कथनाप्रमाणे उत्तरवादी हा धाटाव एम.आय.डी.सी.मधील रेप्टाकोर्स या कंपनीमध्ये काम करीत असून त्याला प्रतिमहिना रू.१५,०००/- वेतन मिळते. परंतू, नमूद वेतनाचे अनुशंगाने अर्जदार क्र.०१ हिने कोणताही लेखी पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. याउलट उत्तरवादी याचे कथन अर्जदार क्र.०१ हिचे आईवडीलांकडे घर, शेती असून टेम्पो असल्याचे दर्शविते. परंतू, सदर बाबीचे अनुशंगाने देखील त्याने कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही.

११. अर्जदार क्र.०१ व उत्तरवादी यांनी अभिलेखावर त्यांचे उत्पन्न व दायित्वाची प्रतिज्ञापत्रे दाखल केली. त्याचे अवलोकन केले असता अर्जदार सध्या तिचे माहेरी राहात असून ती डॉ.ध्रुव यांचे दवाखान्यामध्ये नोकरी करते व तिला प्रतिमहिना रू.४,०००/- वेतन मिळते, तसेच उत्तरवादी हा रेप्टॅकोर्स कंपनीमध्ये कामास असून त्याला प्रतिमहिना रू.७,०००/- वेतन मिळते याबाबी दिसून पडतात. अर्जदारांचे वि.विधीज्ञांनी अर्जदार क्र.०१ सध्या डॉ.ध्रुव यांचे दवाखान्यामध्ये नोकरी करीत नसल्याचे कथन केले. परंतू, त्या अनुशंगाने अर्जदार हिने तिचे कथनामध्ये बदल केला नसून ती सध्या त्या ठिकाणी नोकरी करून उत्पन्न मिळवित नसल्याबाबत सबळ पुरावा दिला नसल्याचे दिसून पडते. महत्वाचे म्हणजे उत्तरवादी याने घेतलेल्या कर्ज रकमांचे अनुशंगाने लेखी परुावा अभिलेखावर दाखल केला नाही.

१२. कौटूंबीक हिंसाचार अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे उत्तरवादी याची दोन्ही अर्जदारांना सांभाळण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे अर्जदार व उत्तरवादी यांचेमधील

कौटूंबिक नातेसंबंधांचे अनुशंगाने वाद असल्याचे दिसून येत नाहीत. नमूद परिस्थितीमध्ये दोन्ही अर्जदार व उत्तरवादी यांचे राहणीमानाचा दर्जा, अर्जदार हिला नर्स म्हणून प्रतिमहिना मिळणारे उत्पन्न, उत्तरवादी याला प्रति महिना मिळणारे उत्पन्न, त्याचेवर असलेल्या जबाबदाऱ्या, कर्ज तसेच इतर खर्चाचे अनुशंगाने अनुपलब्ध पुरावा विचारात घेता माझे मते दोन्ही अर्जदार यांना प्रति महिना रू.४,०००/– रक्कम आर्थिक अनुतोष म्हणून उत्तरवादी याला देणे आदेशीत करणे न्यायोचीत ठरेल. पुढे उत्तरवादी याने अर्जदार क्र.०१ हिचेवर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे अनुशंगाने उपलब्ध पुरावा विचारात घेता अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे त्याचेविरूद्ध संरक्षण आदेश पारीत करणे न्यायोचीत ठरेल. पुढे अर्जदार क्र.०१ हिने कौटूंबिक हिंसाचार अधिनियम कलम १९ अन्वये कायम स्वरूपी किंवा भाडेतत्वावर निवासाची मागणी उत्तरवादी याने करून द्यावी अशी मागणी केली. परंतू, अभिलेखावरील पुरावा अर्जदार क्र.०१ ही तिचे माहेरी आईवडीलांकडे राहात असल्याचे दिसून येते. नमूद परिस्थितीमध्ये तिला वेगळी कायम स्वरूपी निवास व्यवस्था किंवा भाडेतत्वावर असलेल्या निवासाचे व्यवस्थेसंबंधी निकड अर्जदाराने स्पष्ट केली नाही. परिणामी, ती नामंजूर करणे न्यायोचीत ठरेल. त्याचप्रमाणे अर्जदार क्र.०१ हिने तिचा मुलगा स्वराज म्हणजेच अर्जदार क्र.०२ चा ताबा उत्तरवादीकडून मिळण्याची विनंती केली. अभिलेखाची पहाणी केली असता अर्जदार क्र.०२ चे वय चार वर्षे असल्याचे दिसून पडते. नमूद परिस्थितीमध्ये त्याचा ताबा आई म्हणून अर्जदार क्र.०१ कडे देणे न्यायोचीत ठरेल. तिचेपासून त्याला कोणत्याही प्रकारचा धोका किंवा जोखीम असल्याचे उत्तरवादी याने दर्शविले नाही. वरील विवेचनाअंती मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

०१. अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

०२. उत्तरवादी याने अर्जदार क्र.०१ व ०२ यांना कौटूंबीक हिंसाचार अधिनियम कलम २० प्रमाणे एकत्रीतपणे रू.४,०००/–(रुपये चार हजार मात्र) प्रति महिना प्रस्तूत अर्ज दाखल केला तेव्हा पासून म्हणजेच दि.२९/०३/२०२३ पासून प्रस्तूत प्रकरणाचा न्यायनिर्णय होईपर्यंत द्रव्याच्या स्वरुपात अनुतोष द्यावा.

०३. उत्तरवादी याने अर्जदार क्र.०१ हिचे माहेरी म्हणजेच मौजे पालेखुर्द येथील तिचे आईवडीलांचे घरी जाऊन तिचेवर कोणत्याही प्रकारचा कौटूंबीक हिंसाचार करू नये.

०४. अर्जदार क्र.०१ हिने कौटूंबिक हिंसाचार कलम १९(१)(अ) व (ड) अन्वये केलेली निवासाची मागणी नामंजूर करण्यात येते.

०५. उत्तरवादी याने अर्जदार क्र.०२ कु.स्वराज सागर सानप याचा ताबा विनाविलंब अर्जदारास द्यावा. अर्जदार क्र.०१ हिने उत्तरवादी यास अर्जदार क्र.०२ याला भेटण्याकरीता त्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची काळजी घेवून न्यायालयामध्ये तारखेवर हजर ठेवावे.

०६. आदेशाची प्रत अर्जदार क्र.०१ व उत्तरवादी यांना मोफत देण्यात यावी.

०७. आदेशाची प्रत पोलीस स्टेशन, रोहा व संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी. त्यांनी प्रस्तूत आदेशाचे अंमलबजावणीमध्ये अर्जदारास मदत करावी.

स्वाक्षरी/–
(एस. एस. महाले)
न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

स्थळ : रोहा.
दिनांकः ११.१२.२०२३.

(टिप – डिजीटल स्वाक्षरीची मुदत संपल्यामुळे प्रस्तूतचा दस्त डिजीटल स्वाक्षरीने सही केलेला नाही.)

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original Judgment or Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | :- | S.G.Padwal, Grade -III. |
| Name of the Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C. Roha, |
| Judgment / Order dictated on | :- | 11/12/2023. |
| Judgment / Order delivered on | :- | 11/12/2023. |
| Judgment / Order signed on | :- | 11/12/2023. |
| Judgment / Order uploaded on | :- | 11/12/2023. |